CMYK

मेहकरात बौद्ध उपासक, उपासिकेचा भव्य शांती मार्च
>> पान 2

भाजप राजवटीकडून सर्वांची फसवणूक
>> पान 3

हिवरा साबळे वासीयांना हक्काचे पाणी कधी मिळणार ?
>> पान 4

**सुविचार**

स्वप्न पाहा, कारण स्वप्न पाहिल्याशिवाय आपण यशस्वी होऊ शकत नाही.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 240 ■ रविवार, दि. 13 एप्रिल 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




'म्हणून जया बच्चन खूप चिडतात'; लेक श्वेता नंदाने केला मोठा खुलासा
आतील पान

# रायगड हे केवळ पर्यटनस्थळ न राहता ते प्रेरणास्थळ बनावे

## केंद्रीय गृह मंत्री अमित शाह यांचे प्रतिपादन

## छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३४५ व्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन

**दैनिक आपला विदर्भ**

**रायगड/प्रतिनिधी : छत्रपती शिवजी महाराज हे केवळ महाराष्ट्राचे नव्हे तर संपूर्ण जगाचे प्रेरणास्थान आणि आदर्श आहेत. त्यामुळे छत्रपती शिवरायांची राजधानी असलेले रायगड हे केवळ पर्यटनस्थळ न राहता ते प्रेरणास्थळ बनावे असे प्रतिपादन केंद्रीय गृह मंत्री अमित शाह यांनी केले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३४५ व्या पुण्यतिथीनिमित्त केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आज किल्ले रायगडावर अभिवादन केले. राजसदरेवर श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळाच्या स्थानिक उत्सव समिती महाड यांच्यावतीने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.**

यावेळी व्यासपीठावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.आशिष शेलार,महिला व बालविकास मंत्री कु.आदिती तटकरे, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्र राजे भोसले, रोहयो मंत्री भरत गोगावले, खा.उदयनराजे भोसले, खा.धैर्यशिल पाटील, आमदार सर्वश्री प्रशांत ठाकूर, रविशेठ पाटील, महेश बालदी, प्रवीण दरेकर, विक्रम पाटील, विभागीय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, जिल्हाधिकारी किशन जावळे, मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती नेहा भोसले, जिल्हा पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे, श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळाचे अध्यक्ष रघुजीराजे आंग्रे, सुधीर थोरात, पांडुरंग बलकवडे आदि उपस्थित होते.

दरवर्षी स्मारक मंडळाच्या वतीने स्वराज्याचे साम्राज्यात रूपांतर होत असताना योगदान देणाऱ्या सरदार घराण्याचा सन्मान करण्यात येतो. यंदा होळकर घराण्याचा सन्मान करण्यात आला. >> पान २



# सीमेवरील शत्रू अमित शाहांमुळे बिळात लपून बसलेत, त्यांचं भाषण ऐकून अंगावर शहारे आले

## एकनाथ शिंदेंकडून अमित शाहांची तोंडभरुन स्तुती

**रायगड/प्रतिनिधी :** आज देशाचे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह रायगड दौऱ्यावरती आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांची आज तिथीनुसार पुण्यतिथी आहे. त्यामुळे अमित शाह यांनी किल्ले रायगडावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीला अभिवादन केलं. यावेळी रायगडावरती राज्याचे मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री, खासदार, आमदार आदी नेते उपस्थित होते. यावेळी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांचं मनोगत व्यक्त केलं. बोलताना शिंदे म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज यांना तसे फार मोठे आयुष्य मिळाले नाही. आणखी २० ते ३० वर्षे महाराज असते तर देशाचा इतिहास बदलला असता, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे. त्याचबरोबर यावेळी अमित शाहांच्या उपस्थितीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बोलताना अमित शाह आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावरती स्तुतीसुमनांचा वर्षाव केला आहे.

रायगडाने छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक पाहिला...



यावेळी बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले, रायगडाने छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक पाहिला. तसंच रायगडाने म हाराजांचा शेवटचा दिवसही पाहिला. महाराज अवघ्या ५०व्या वर्षी वारले. ते आणखी २० ते ३० वर्षे जगले असते तर आपला सगळा इतिहास बदलून गेला असता असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी म्हटलं आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याचं तोरण बांधलं असंही एकनाथ शिंदेंनी म्हटलं आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांनी स्वराज्याचे तोरण बांधले नसते तर आजही आपण गुलाम गिरीमध्ये खितपत पडलो असतो. शिवरायांमुळेच आपले अस्तित्व आहे हे कुणाला विसरता येणार नाही. शिवबाच्या बाबतील आपण काय सांगावे त्यांनी ज्या वाघ नखांनी अफजल खानाचा कोथळा काढला ती वाघ नखे आपण ब्रिटनवरुन आणली आहेत. त्यांचे दर्शन घेण्यासाठी रांगा लागल्या आहेत. शिवरायांनी हाती तलवार घेतली पण निष्पाप लोकांच्या रक्ताने ती रंगू दिली नाही. त्यामुळे त्यांच्या रणनितीला रक्ताचा वास येत नाही तर मानवतेचा सुगंध येतो, असंही एकनाथ शिंदेंनी म्हटलं आहे.

# नागपूरच्या उमरेड एमआयडीसीतील कंपनीत स्फोटानंतर आग, पाच कामगारांचा मृत्यू

**दैनिक आपला विदर्भ**

**नागपूर/प्रतिनिधी :** उमरेड एमआयडीसीतील कंपनीला शुक्रवारी आग लागली होती. या कंपनीत अल्युमिनियम फॉइल आणि पावडर तयार केली जाते. या कंपनीत शुक्रवारी सायंकाळी स्फोट झाला होता. स्फोटानंतर भीषण आग लागली. स्फोटात काही कामगार जखमी झाले होते. तर अनेक कामगार हे बेपत्ता होते. यातील पाच कामगारांचा मृत्यू झाल्याची माहिती नागपूर ग्रामीणच्या पोलीस अधीक्षकांनी दिली.

उमरेर येथील अल्युमिनियम फॉइल कारखान्यात झालेल्या स्फोटात पाच जणांचा मृत्यू झालाय. यातील दोन जणांचा रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला, तर बेपत्ता झालेल्या ३ जणांच्या मृत्यूची पुष्टी झाली आहे. हा स्फोट शुक्रवारी रात्री झाला असून, त्यानंतर कंपनीत भीषण आग लागली. याबाबतची माहिती नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार यानी दिली.

मृतांची नावं : मृत्यूचा आकडा वाढण्याची शक्यता आहे. जखमी कामगारांवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. जखमींची तब्येत चिंताजनक आहे. निखिल नेहारे (२४), अभिषेक जांगड (२०), निखिल शेंडे (२५), पियुष दुर्गे (२१) आणि सचिन मेश्राम (२६) अशी मृतांची नावे आहेत. हे सर्व कामगार उमरेड येथील रहिवासी आहेत.

कंपनीत अल्युमिनियम पावडर असल्यानं आग विझवण्यात मोठी अडचण आली. संपूर्ण पावडर जळून खाक झाल्यानंतर आग आटोक्यात आली, अशी माहिती, उमरेडचे पोलीस निरीक्षक धनाजी जळक यांनी दिली. नागपूर येथून काही अग्निशमन दलाच्या गाड्या उमरेडसाठी पाठवण्यात आल्या होत्या.

# दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाने मोफत उपचार करतो सांगून प्रकाश आमटेंकडून औषधांसाठी पाच लाख मागितले

## विजय वडेट्टीवारांचा गंभीर आरोप

**दैनिक आपला विदर्भ**

**नागपूर/प्रतिनिधी :** प्रकाश आमटे हे थोर समाजसेवक होते. त्यांना कर्करोग झाल्यावर दीनानाथ रुग्णालयात दाखल केले. दीनानाथ रुग्णालयाकडून प्रकाश आमटे यांच्याकडून आम्ही एकही रुपया आम्ही घेणार नाही, असे सांगितले होते. नंतर उपचार सुरू झाले तेव्हा बाहेरुन औषधे मागवण्याच्या नावाखाली दीनानाथ रुग्णालयाने आमटे यांच्याकडे पाच लाख रुपये मागितले. महाराष्ट्रभूषण थोर सम ाजसेवकालाही दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाने सोडले नाही, असे वक्तव्य दीनानाथ काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी केले. दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात गरोदर महिलेचा मृत्यू झाल्याप्रकरणी सुरु असलेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी पुन्हा एकदा टीकास्त्र सोडले. तनिषा भिसे यांना वेळीच उपचार मिळाले असते तर त्यांचा जीव वाचला असता. मी मंगेशकर रुग्णालय आणि मंगेशकर कुटुंबीयांबद्दल वक्तव्य केलं, तर माझ्यावर टीका झाली, असे त्यांनी म्हटले. ते शनिवारी नागपूरमध्ये प्रसारमाध्यमांशी बोलत होते.



# बनावट शिक्षक व मुख्याध्यापक नियुक्ती प्रकरणात नागपूर पोलिसांचा धक्कादायक खुलासा!आरोपी वाढण्याची शक्यता; शिक्षण विभागात मोठी खळबळ

**दैनिक आपला विदर्भ**

**भंडारा/प्रतिनिधी :** भंडाऱ्यातील लाखनी तालुक्यातील जेवणाळा गावातील नानाजी पुंडके शाळेत मुख्याध्यापक म्हणून नेमणूक मि ळालेल्या मुख्याध्यापकाने कधीच आमच्या कडे शिक्षक म्हणून नोकरी केलेली नाही. त्यामुळे त्यांचे अनुभवाचे दाखले खोटे असल्याचे संबंधित शाळेने कळवल्यानंतर ही नागपूरच्या शिक्षण उपसंचालक कार्यालयाने त्या मुख्याध्यापक विरोधात कोणतीही कारवाई केली नाही. म्हणून नागपूर विभागाचे शिक्षण उपसंचालक उल्हास नरड यांना नागपूर पोलिसांनी (ञुज्ली इ्दत्म) अटक केली आहे. या प्रकरणी अधिकचा तपास सुरू असून आरोपी वाढण्याची शक्यता असल्याची माहिती पोलीस उपायुक्त राहुल मदने यांनी दिली आहे. विभागीय शिक्षण उपसंचालक उल्हास नरड यांना नागपूर पोलिसांनी काल (११ एप्रिल) रात्री अटक केल्यामुळे शिक्षण विभागात मात्र मोठी खळबळ उडाली आहे. >> पान २

# विधेयकावर निर्णय घेण्यासाठी राष्ट्रपतींना तीन महिन्यांची कालमर्यादा, सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय

नवी दिल्ली :विधिमंडळ आणि संसदेतील विधेयकांशी संबंधित एका प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने एक महत्त्वाचा निर्णय दिला आहे. न्यायालयाने म्हटले आहे की, राष्ट्रपतींनी त्यांच्या विचारार्थ पाठवलेल्या विधेयकांवर तीन महिन्यांत निर्णय घ्यावा. देशाच्या सर्वोच्च न्यायालयाने राष्ट्रपतींसाठी स्पष्ट वेळेची मर्यादा निश्चित करण्याची ही पहिलीच वेळ आहे. संविधानाच्या कलम २०१ अंतर्गत राष्ट्रपतींच्या निर्णयासाठी कोणतीही कालमर्यादा निश्चित केलेली नसल्यामुळेही हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे.



न्यायमूर्ती जे.बी. पार्डीवाला आणि न्यायमूर्ती आर. महादेवन यांच्या खंडपीठाने ८ एप्रिल रोजी राखीव ठेवलेला निर्णय जाहीर केला आहे. ज्यामध्ये म्हटले आहे की, या कालावधीपेक्षा (तीन महिन्यांपेक्षा) जास्त विलंब झाल्यास संबंधित राज्याला त्याबाबत कळवावे लागेल आणि विलंबाचे कारण द्यावे लागेल. न्यायालयाचा हा निर्णय अशा वेळी आला जेव्हा तामिळनाडूचे राज्यपाल आर एन रवी यांनी राष्ट्रपतींकडे १० विधेयके पाठवली होती. या कृतीला न्यायालयाने ''बेकायदेशीर आणि चुकीची'' असल्याचे म्हटले होते.

यादरम्यान, न्यायालयाने सरकारिया आयोग आणि पुंछी आयोगाचाही उल्लेख केला, ज्याम ध्ये कलम २०१ अंतर्गत प्रकरणे निकाली काढण्यासाठी निश्चित कालमर्यादा स्वीकारण्याची शिफारस करण्यात आली होती. त्याच वेळी, पुंछी आयोगानेही कलम २०१ मध्ये कालमर्यादा निश्चित करण्याचे सुचवले होते.

या प्रकरणावर न्यायमूर्ती जे. बी. पार्डीवाला आणि आर. म हादेवन यांच्या खंडपीठाने म्हटले की, ''हे स्पष्ट केले पाहिजे की, जर एखाद्या संवैधानिक प्राधिकरणाने वाजवी वेळेत आपली कर्तव्ये पार पाडली नाहीत तर न्यायालये त्यामध्ये हस्तक्षेप करू शकतील. जेव्हा राज्यपाल राष्ट्रपतींच्या विचारार्थ विधेयक राखून ठेवतात आणि राष्ट्रपती त्याला संमती देत नाहीत, तेव्हा राज्य सरकारला अशा कारवाईला या न्यायालयात आव्हान देण्याचा अधिकार असेल.''

''अनुच्छेद २०१ अंतर्गत राष्ट्रपतींना विधेयकांचा विचार करावा लागतो आणि हे काम वेळेच्या मर्यादेमुळे मर्यादित असू शकते हे आम्हाला मान्य आहे, परंतु ही वस्तुस्थिती राष्ट्रपतींच्या निष्क्रियतेचे समर्थन करू शकत नाही,'' असे निकालपत्रात म्हटले आहे.

खंडपीठाने म्हटले आहे की, ''कोणत्याही वैध कारणाशिवाय किंवा गरजेशिवाय राष्ट्रपतींनी निर्णय घेण्यास विलंब करणे हे संविधानाच्या मूलभूत तत्त्वाच्या विरुद्ध असेल. कोणताही अधिकार मनमानीपणे वापरला जाऊ शकत नाही.''

CMYK

## डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे जलविषयक धोरण

विश्वरत्न महामानव, भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची उद्या १३४ वी जयंती. १४ एप्रिल १८९१ रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा मध्यप्रदेशातील महू या गावी जन्म झाला. डॉ बाबासाहेब आंबेडकरांना १३४ व्या जयंतीदिनी विनम्र अभिवादनन! डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी उभे आयुष्य दीन दलीत, उपेक्षित, वंचित वर्गासाठी, महिलांच्या कल्याणासाठी घालवले. या वर्गासाठी डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी जे कार्य केले ते सर्वांनाच माहीत आहे मात्र डॉ बाबसाहेब आंबेडकरांचे कार्य हे इतपतच मर्यादित नाही. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी कायदा, मानववंश शास्त्र, राज्यशास्त्र आणि समाजशास्त्र अशा अनेक क्षेत्रात बहुमोल कामगिरी बजावली. मात्र डॉ बाबासाहेब आबेडकरांनी देशाच्या अर्थशास्त्रात आणि जल धोरणात महत्वाची भूमिका बजावली हे खूप कमी लोकांना माहीत आहे. आज महाराष्ट्रातच नाही तर संपूर्ण भारतातच दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. दर दोन वर्षांनी राज्यावर दुष्काळाची गडद छाया पसरते या वर्षीही राज्यावर किंबुहूना देशावर दुष्काळाचे सावट आहे अशावेळी बाबासाहेबांच्या जलधोरणाची आणि त्याच्या अमंबजावणीची किती गरज आहे याची प्रकर्षाने जाणीव होते. देशाची जलनीती, दामोदर खोरे प्रकल्प, हिराकुड धरण, सोननदी प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी डॉ बाबासाहेब आबेडकरांनी महत्वपूर्ण भूमिका बजावली. आपल्या देशात जो पाऊस पडतो तो ठराविक कालावधीत म्हणजेच मोसमात पडतो. जून ते सप्टेंबर हा आपल्याकडे पावसाचा मोसम समजला जातो कारण याच चार महिन्यात आपल्याकडे पाऊस पडतो म्हणून त्याला मोसमी पाऊस म्हणतात. या चार महिने पडणाऱ्या पावसावरच आपली शेती अवलंबून आहे. आपला देश कृषीप्रधान देश आहे जर या चार महिन्यात पुरेसा पाऊस झाला नाही तर त्याचा परिणाम आपल्या शेतीवर पर्यायाने देशाच्या अर्थव्यवस्थेवर होतो. दुसरी बाब म्हणजे आपल्या देशात सर्वत्र सारखाच पाऊस पडतो असे नाही काही भागात धो धो पाऊस कोसळतो तर काही भागात पाऊसच पडत नाही. पावसाच्या विषम प्रमाणामुळे देशात एकाच वेळी काही भागात पाण्याचे दुर्भिक्ष्य तर काही भागात अती पाऊस झाल्याने पूर जन्य परिस्थिती असे चित्र दिसते. पावसाच्या या लहरिपणाचा परिणाम देशाच्या अर्थव्यवस्थेवर होतो. निसर्गावर आपले नियंत्रण नाही मात्र पाण्याचे योग्य नियोजन आणि व्यवस्थापन करून या संकटावर मात करता येऊ शकते हे बाबासाहेबांनी जाणले होते. २० जुलै १९४२ रोजी डॉ बाबासाहेब आबेडकरांनी मजूर मंत्री म्हणून सूत्रे हाती घेतली. त्यांचा व्हॉईसरॉय कार्यकारी मंडळाचे सभासद म्हणून समावेश करण्यात आला आणि त्यांच्याकडे श्रम, जलसिंचन आणि वीज हे विभाग सोपवण्यात आले. दुसऱ्या महायुध्दानंतरचे व्यापक विकासाचे धोरण सिंचन व वीज या विषयावर तपशीलवार धोरण तयार करण्यासाठी बाबासाहेबांनी पुढाकार घेतला. १९३५ च्या कायद्यानुसार श्रम विभागाने सिंचन व वीज विकासासाठी मुख्यत्वे तीन गोष्टी कार्यान्वित करण्याचे ठरले. १) एकापेक्षा दोन राज्यात वाहणाऱ्या नद्यांचे नियंत्रण व व्यवस्थापन करणे २) राज्यांमधील नद्यांवर पाणी व जल विद्युत ऊर्जा संपत्ती निश्चित करणे ३) शासकीय व तांत्रिक विकास करण्यासाठी राष्ट्रीय धोरण काय असावे ? या गोष्टींचा समावेश होता. घटना तयार करतानाही बाबासाहेबांनी घटनात्मक तरतुदी करून ठेवल्या. बाबासाहेबांनी घटनेचा आराखडा घटना समितीस सादर करताना पाणी हा विषय केंद्र शासनाच्या अख्त्यारीत असावा अशी भूमिका मांडली. बाबासाहेबांनी घटनेत पाणी हा विषय क्रमांक ५६ मध्ये अंतर्भूत केला त्यामुळे केंद्र शासनाला पाण्यासंबंधी कायदा करण्याचे अधिकार मिळाले. भारताच्या राज्यघटनेत ही तरतूद कलम २६२ मध्ये समाविष्ट करण्यात आली. याच तरतुदी अंतर्गत आंतरराज्य जलविवाद कायदा नदिखोर प्राधिकरण कायदा १९५६ पारित करण्यात आला. नोव्हेंबर १९४५ मध्ये कटक येथे झालेल्या पाणी परिषदेत बाबासाहेबांनी अत्यंत मौलिक विचार देशाला दिले. पाणी आणि महापूर विनाशकारी आहे असे गृहीत धरून सुचवू नका. देशामध्ये एवढे पाणी उपलब्धच नाही की जे हानिकारक ठरू शकेल. भारतीय जनतेला पाण्याच्या कमतरतेमुळे जास्त कष्ट सोसावे लागतात. जास्त पाण्याच्या उपलब्धेमुळे नाही. पाणी राष्ट्रीय संपत्ती असल्यामुळे पावसाळ्यात पडणाऱ्या असमतोल पावसामुळे पुराच्या जास्त पाण्याविषयी तक्रार करण्यापेक्षा या पुराच्या पाण्याचा मनुष्याच्या विकासासाठी धरणे बांधून कसा उपयोग करता येईल हा दृष्टिकोन बाळगला पाहिजे. त्यामुळे जिथे पुरामुळे नुकसान होत असते त्या नद्यांवर ठिकठिकाणी धरणे बांधून हे पाणी समुद्राला जाऊ न देता विकासा साठी वापरणे इष्ट ठरेल असे विचार बाबासाहेबांनी मांडले होते. बाबासाहेबांच्या या विचाराने प्रभावित होऊन केंद्रीय जलमार्ग, पाटबंधारे, नौकायन आयोगाचे अध्यक्ष ए. एन. खोसला यांनी महानदिवरील बहुउद्देशीय विकास प्रस्तावावर बाबासाहेबांशी चर्चा करून हिराकुड धरणाची अमंबजावणी केली. कटक येथील पाणी परिषदेत बाबासाहेबांनी मांडलेल्या विचारांची अमंबजावणी झाली असती तर आज पडणारा दुष्काळ पडला नसता. आज नदी जोड प्रकल्पाची जी संकल्पना मांडली जात आहे ती संकल्पना मूळची बाबासाहेबांचीच होती हे खूप कमी लोकांना माहीत आहे. ज्या समाजाला हजारो वर्ष पाण्यापासून दूर ठेवले त्याच समाजातील बाबासाहेबांनी देशवासीयांना मुबलक पाणी व वीज मिळावी यासाठी प्रयत्न केले. बाबासाहेबांशिवाय जल व्यवस्थापनाच्या बाबतीत इतका सखोल विचार कुणी केला नाही आणि दूरदृष्टीपणा दाखविलेला नाही आणि म्हणूनच डॉ बाबासाहेब आंबेडकर हे खऱ्या अर्थाने देशाचे हितचिंतक ठरतात.

# मेहकरात बौद्ध उपासक, उपासिकेचा भव्य शांती मार्च

दैनिक आपला विदर्भ





**मेहकर/प्रतिनिधी :** भिक्कु संघाच्या नेतृत्वाखाली आज मेहकर शहरात बौद्ध उपासक,उपासिकेचा भव्य शांती मार्च काढण्यात आला राष्ट्रपती ,भारत सरकार यांना तहसीलदार मेहकर यांच्या मार्फत दिलेल्या निवेदनात म्हटले की विश्वातील प्रथम मार्गदाता तथागत भगवान गौतम बौद्ध यांना बिहार राज्यातील गया येथे बोधी वृक्षाखाली ज्ञान प्राप्ती झाली होती.राजे सम्राट यांनी त्याठिकाणी महाबोधी महाविहार बनवले आहे.हे महाबोधी महाविहार समस्त बौद्ध राष्ट्र आणी भारतीय बौध्दांचे श्रद्धा आणी आस्थेचे केंद्र आहे.परंतु या महाबोधी महाविहार वर काही विशिष्ट समाजाने कब्जा केला आहे.विहाराची बुद्धीस्ट परंपरा विकृत करण्याचे प्रयत्न केले जात आहेत.यामुळे भारतीय बौद्धां मध्ये व सर्व बौद्ध राष्ट्र यांच्या आस्थेला गंभीर ठेच पोहोचली आहे.मोठ्या प्रमाणात जन आक्रोश सर्वत्र पसरला आहे. तेव्हा बीटीएमसी १९४९ हा कायदा खारीज करून महाबोधी महाविहार बौद्ध गया बिहार हे भारतीय बौद्धांच्या ताब्यात देण्यात यावे अशी मागणी करण्यात आली आहे. आजच्या शांती मार्च मध्ये भिक्कु शिवली अंगुलीमाल थेरो,भिक्कु यशोदीप थेरो,भिक्कु संघपाल थेरो,भदंत शेषबोधी,भदंत यशोदीप, शिवसेना(उद्धव बाळासाहेब ठाकरे) आमदार सिध्दार्थ खरात, अॅड.अनंतराव वानखेडे, शैलेश बावस्कर, प्रा.डी.जी.गायकवाड, अॅड.संदीप गवई,सुरेश सरकटे,प्रा. ओम गजभीये,संजय वानखेडे, किशोर गवई, किशोर आराख,गजेंद्र माने,विजय सपकाळ, अॅड.विष्णू सरदार, गजानन जाधव, जितेंद्र वाढवे, मुरलीधर गवई, संघपाल पनाड, सुनील अंभोरे, आकाश अवसरमोल, पी.पी. वाकोडे, प्रभाकर खंडारे, न.ल.खंडारे, डॉ. विनोद वानखेडे, वाय.जी.अंभोरे, वसंतराव वानखेडे, बाळू वानखेडे सह बौद्ध उपासक,उपासिका सहभागी झाले होते यावेळी मनोगत व्यक्त करताना आमदार सिध्दार्थ खरात बोलले की तथागत भगवान गौतम बुद्ध यांनी जगाला शांतीचा संदेश दिला. सगळीकडे जगात बौद्ध धर्म पसरलेला आहे. धर्म आपल्याला जगण्याचे शिकवतो.दु:ख हरण करण्याचे काम धर्म करतो. आपला धर्म तथागतांच्या शिकवणुकीवर चालण्यासाठी हे महाबोधी महाविहार आपल्या ताब्यात येण्यासाठी आपला लढा शांततेच्या मार्गाने सुरू आहे. विधानसभेत सुद्धा मी याबाबत आवाज उठवला आहे. मी आधी बौद्ध उपासक नंतर आमदार आहे. लवकरच बुलढाणा जिल्ह्याचा शांती मार्च काढू असेही ते बोलले. यावेळी मान्यवरांची सुद्धा भाषणे झाली.

# निफाड तालुक्यातील वेळापूर येथील गव्हाच्या शेतात वीजेच्या तारा आणि पोल पडल्याने गहू जळून खाक



दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी :** निफाड तालुक्यातील लासलगाव जवळील वेळापूर येथील निलेश हिरामण पालवे या शेतकऱ्याच्या काढणीला आलेल्या अंकुर केदार या चांगल्या दर्जाच्या गव्हामध्ये अचानक वीज वितरण कंपनीचे पोल आणि तारा पडल्यामुळे जवळपास अडीच एकर गहू पूर्णतः जळून खाक झाल्याची घटना घडली आहे. ७० ते ८० हजार रुपये खर्च करत ६० क्विंटल गव्हाचे उत्पादन येणार होते यात शेतकऱ्यांचे अंदाजे दोन लाख रुपयांचे नुकसान झाले.

# 'म्हणून जया बच्चन खूप चिडतात'; लेक श्वेता नंदाने केला मोठा खुलासा

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** बॉलीवूडमधील ज्येष्ठ आणि प्रतिष्ठित अभिनेत्री, तसेच राज्यसभा खासदार, जया बच्चन या अनेकदा त्यांच्या जाहीर कार्यक्रमांमधील विशिष्ट प्रतिक्रियांमुळे आणि परखड वक्तव्यांमुळे माध्यमांमध्ये चर्चेचा विषय ठरतात. विशेषतः, अनेक सार्वजनिक ठिकाणी माध्यमांशी किंवा छायाचित्रकारांशी बोलताना त्या काहीशा चिडलेल्या किंवा रागावलेल्या दिसतात आणि याचे व्हिडिओ सोशल मीडियावर अनेकदा व्हायरल होत असतात.
मात्र, त्यांच्या या वरकरणी दिसणाऱ्या चिडचिडेपणामागे एक विशिष्ट वैद्यकीय कारण असल्याचे गुपित आता त्यांचीच मुलगी, श्वेता बच्चन नंदा यांनी उघड केले आहे.

श्वेता नंदाने केला खुलासा

नुकत्याच काही काळापूर्वी प्रसारित झालेल्या प्रसिद्ध निर्माता-दिग्दर्शक करण जोहरच्या 'कॉफी विथ करण' या लोकप्रिय चॅट शोमध्ये श्वेता बच्चन नंदा आपला भाऊ आणि सुप्रसिद्ध अभिनेता अभिषेक बच्चन याच्यासोबत पाहुणी म्हणून सहभागी झाली होती. या कार्यक्रमामध्ये करण जोहरसोबत मनमोकळ्या गप्पा मारताना, श्वेताने आपली आई, जया बच्चन, यांच्या सार्वजनिक ठिकाणी अनेकदा दिसून येणाऱ्या आणि चर्चेत असणाऱ्या चिडचिडेपणामागील किंवा रागामागील खरे कारण काय आहे, याचा खुलासा केला. श्वेताने या मुलाखतीत सांगितले की, तिच्या आईला म्हणजेच जया बच्चन यांना 'क्लॉस्ट्रोफोबिया' नावाचा एक प्रकारचा मानसिक आजार किंवा स्थिती आहे. क्लॉस्ट्रोफोबिया म्हणजे काय, हे स्पष्ट करताना श्वेता म्हणाली की, हा एक असा त्रास आहे ज्यामुळे जेव्हा एखादी व्यक्ती अचानकपणे मोठ्या गर्दीमध्ये किंवा एखाद्या बंदिस्त जागेत अडकते, तेव्हा ती व्यक्ती आतून प्रचंड अस्वस्थ होते आणि तिला घुसमटल्यासारखे वाटते. बऱ्याच वेळा या तीव्र अस्वस्थतेमुळे संबंधित व्यक्तीला अचानक खूप राग येऊ शकतो किंवा अत्यंत टोकाच्या परिस्थितीमध्ये ती व्यक्ती घाबरून बेशुद्ध देखील पडू शकते, असे श्वेताने या आजाराबद्दल अधिक माहिती देताना स्पष्ट केले.

पान १ वरून...

## रायगड हे केवळ पर्यटनस्थळ

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते उदयसिंह होळकर यांचा सन्मान करण्यात आला. तसेच सैन्यदल अधिकारी ले.जन. संजय कुलकर्णी यांचा सन्मान करण्यात आला. केंद्रीय गृहमंत्री श्री. शाह यांच्याहस्ते श्री शिवपुण्यस्मृती रायगड पुरस्कार दुर्ग अभ्यासक निलकंठ रामदास पाटील यांना प्रदान करण्यात आला. तसेच अशोक बांगर लिखित शिवरायमुद्रा' स्मरणिका प्रकाशन करण्यात आले.
यावेळी उपस्थित शिवप्रेमींशी संवाद साधताना श्री.शाह म्हणाले छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३४५ व्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचं भाग्य लाभलं. सुरुवातीलाच मी राजमाता जिजाऊंना मनःपूर्वक प्रणाम करतो. मी शिवचरित्र वाचलंय, त्यांनी छत्रपतींना फक्त जन्मच दिला नाही, तर स्वराज्य, स्वधर्म आणि स्वभाषेचा पुनरुद्धार करण्याची प्रेरणाही दिली. स्वतंत्र स्वराज्य निर्माण करण्याचा विचारही जिजाऊंनी बाल शिवाजींना दिला. हिंदवी स्वराज्याची राजधानी असलेल्या रायगड या ऐतिहासिक स्थळी शिवाजी महाराजांना प्रणाम करतांनाच्या माझ्या भावना वर्णन करू शकत नाही असेही ते म्हणाले.
दृढ इच्छाशक्ती, अगम्य साहस, अकल्पनीय रणनीत आणि समाजातील सर्व वर्गांना एकत्र करुन अपराजित सैन्याची स्थापना हे शिवरायांशिवाय कोणाला जमलं नाही. महाराजानंतर धर्मवीर संभाजी महाराज, महाराणी ताराबाई, धनाजी, संताजी यांनी औरंगजेब जिवंत असेपर्यंत त्याच्याशी लढा दिला. स्वतःला आलमगीर म्हणणाऱ्या औरंगजेबाची महाराष्ट्रात कबर बांधली गेली. भारतातील पुढच्या पिढीला हा इतिहास शिकवला गेला पाहिजे. सातवी ते बारावीचा प्रत्येक विद्यार्थी एकदा या पुण्यस्थळी यावा यासाठी धोरण बनवावं अस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना चर्चे दरम्यान सांगितले असल्याचेही श्री.शाह यांनी यावेळी सांगितले. रायगड किल्ला इंग्रजांनी जाणूनबुजून तोडण्याचा प्रयत्न केला. मात्र लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांनी ठणकावून स्वराज्याचा जयघोष केला असही श्री.शाह म्हणाले. तसेच त्यांनी यावेळी बाबासाहेब पुरंदरेंचेही स्मरण केले. छत्रपती शिवरायांना महाराष्ट्रापुरते सीमित ठेवू नका, त्यातून देश आणि जगाला प्रेरणा घेऊ द्या असेही त्यांनी यावेळी सांगितले. न्यायासाठी शिवरायांचे सिद्धांत त्यांनीच प्रस्थापित केले. स्वराज्याची, स्वभाषेला अमर करण्याची लढाई थांबता कामा नये, हे शिवरायांचे अखेरचे शब्द होते. छत्रपती शिवारायांचे हे शब्द प्रमाण मानून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात ही लढाई गौरवाने जगभरात सुरु आहे. भारताला विश्वभरात गौरवमय स्थानी प्रस्थापित करण्याचं काम मोदी सरकार करत आहे असेही त्यांनी यावेळी सांगितले.
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार आणि बाबासाहेब आंबेडकरांचे संविधान घेऊन सरकार पुढे जात आहे. महाराजांच्या बारा किल्ल्यांचा जागतिक वारसा स्थळांमध्ये समावेश व्हावा, यासाठी युनेस्को कडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. यासाठी युनेस्को परिषदेत सादरीकरण करण्यासाठी मी आणि सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार जाणार आहोत. छत्रपती शिवाजी महाराजांचा प्रमाण इतिहास तयार करण्यासाठी प्रयत्न केले जातील अशी ग्वाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिली. शिवाजी महाराजांचे अरबी समुद्रातील स्मारकाचे काम लवकर सुरू करण्याचा सरकारचा मानस आहे. हे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. पण लवकर त्यावर तोडगा निघेल असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला.
शिवाजी महाराज हे व्यक्ती नाही विचारसरणी होती. गडकिल्ले हे स्वराज्याचे प्रतीक आहेत. गडकोट किल्ल्यांचे संरक्षण आणि अतिक्रमण मुक्त झाले पाहिजे यासाठी सरकार पुढाकार घेतय पण पुरातत्व विभागाने सहकार्य करावे अशी मागणी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श घेवून हे सरकार काम करत आहे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.
खासदार उदयन राजे भोसले यांनी छत्रपती शिवाजी महाराज तसेच युगपुरुषांचा वारंवार होणारा अवमान थांबवण्यासाठी अजामीनपात्र कायदा तयार करण्याची मागणी यावेळी केली. तसेच महाराजांवरील पुस्तके आणि चित्रपटासाठी सिनेमॅटीक लिबर्टीच्या संदर्भातही एक सेन्सॉर बोर्ड अशी मागणी यावेळी केली. तसेच रामायण सर्किट, बौद्ध सर्किटच्या धर्तीवर शिवस्वराज्य सर्किट व्हावे, दिल्लीत महाराजांचे राष्ट्रीय स्मारक व्हावे, दावणगिरी जिल्ह्यातील शहाजी महाराजांच्या समाधीसाठी केंद्र व राज्य सरकारने निधी उपलब्ध करून द्यावा. अरबी समुद्रातील स्मारकाचे भूमीपूजन झाले. त्यात काही अडचणी आल्या असतील तर राज्यपाल भवनात मुबलक जागा आहे हे स्मारक तिथे करण्यात यावे अशी सूचना वजा मागणी खा.उदयनराजे भोसले यांनी यावेळी केली.
या सर्व कार्यक्रमानंतर केंद्रीय गृहमंत्री श्री.शाह आणि उपस्थित सर्व मान्यवर यांनी जगदीश्वर मंदिरात जाऊन दर्शन घेतले. तसेच समाधी स्थळ येथे भेट देऊन अभिवादन केले. यावेळी समाधी स्थळावर हेलिकॉप्टर द्वारे पुष्पवृष्टी करण्यात आली. तसेच रायगड पोलीस दलाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांना शासकीय मानवंदना देण्यात आली.
या कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळाचे अध्यक्ष रघुजीराजे आंग्रे यांनी केले तर सूत्र संचलन मोहन शेटे यांनी केले. या कार्यक्रमाला विविध विभागांचे शासकीय अधिकारी, कर्मचारी, पत्रकार तसेच शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बनावट शिक्षक व मुख्याध्यापक नियुक्ती

शिक्षक पदाचा कोणताही अनुभव नसताना थेट मुख्याध्यापक

बनावट शिक्षक व मुख्याध्यापक नियुक्ती प्रकरणात नागपूर पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. बोगस कागदपत्रांच्या आधारावर मुख्याध्यापक पदासाठी नेमणूक दिल्या प्रकरणी उल्हास नरड यांना अटक करण्यात आली आहे. तर याच प्रकरणात भंडारा जिल्ह्याच्या लाखनी तालुक्यातील जेवनाळा गावातील नानाजी पुंडके शाळेतील मुख्याध्यापक पराग पुंडके यांनाही अटक करण्यात आली आहे.

आरोपी मुख्याध्यापक पराग पुंडके याला शिक्षक पदाचा कोणताही अनुभव नसताना तसेच शिक्षक म्हणून त्याने कुठेही काम केले नसताना सरळ मुख्याध्यापक बनविण्यात आले होते.

आरोपी वाढण्याची शक्यता; शिक्षण विभागात मोठी खळबळ

विशेष म्हणजे बनावट शिक्षक नियुक्ती प्रकरणात यापूर्वी वेतन पथक आणि भविष्य निर्वाह निधी अधीक्षक निलेश वाघमारे यांना निलंबित करण्यात आले होते. शिक्षक म्हणून कोणताही अनुभव नसताना पुंडकेची मुख्याध्यापक म्हणून नेमणुक करत शालार्थ आयडी ही देण्यात आला होता. पराग पुंडकेने नागपुरातील ज्या शाळेचे दस्तावेज देत त्या शाळेत शिक्षक म्हणून नोकरीचा प्रदीर्घ अनुभव असल्याचा दावा केला होता. पोलीस तपासत त्याच शाळेने पोलीस तपासात स्पष्ट केले की, पराग पुंडके त्यांच्याकडे कधीच नोकरीला नव्हता. त्यानंतर पोलिसांनी नरड आणि पुंडके या दोघांना अटक केली आहे. दरम्यान, यात आणखी कोण आरोपी आहे, या अनुषंगाने तपास सुरू असल्याची माहिती पोलीस उपायुक्त राहुल मदने यांनी दिलीय.


DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### पुण्यात महाराष्ट्र माझा आंबा महोत्सवाचे आयोजन, महोत्सवात बच्चे कंपनीसाठी अनोखी स्पर्धा






दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** महाराष्ट्र नवनिर्माण सेने तर्फे दरवर्षी एका अनोख्या आंबा महोत्सवाचा आयोजन करण्यात येतं. या महोत्सवामध्ये बच्चे कंपनीसाठी आंबा खाण्याची स्पर्धा भरवली जाते. दरवर्षीप्रमाणे यंदाही ही स्पर्धा येथील भरवण्यात आलीये जो चिमुकला सगळ्यात जास्त आंबे खाईल त्याला या ठिकाणी बक्षीस देखील देण्यात येत. बक्षीस म्हणून एक आंब्याची पेटी या चिमुकल्याला देण्यात येते पुण्यातील बालगंधर्व येथे ही स्पर्धा भरवण्यात आलीये. गेल्या १५ वर्षापासून महाराष्ट्र माझा आंबा महोत्सव हा अनोखा उपक्रम मनसेकडून भरवण्यात येतोय या महोत्सवा अंतर्गत थेट कोकणातून आंबे ग्राहकांना मिळतात आणि त्याच पार्श्वभूमीवर चिमुकल्यांची स्पर्धा देखील या ठिकाणी भरवण्यात येते. यावेळी चिमुकल्याने देखील मोठ्या प्रमाणात या स्पर्धेमध्ये सहभाग घेतल्याचे पाहायला मिळाले.

### माणिकराव कोकाटेंना मंत्रिमंडळात ठेऊ नका, राजू शेट्टी यांची मागणी




दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी :** माणिकराव कोकाटे यांच्यासारख्या बेताल वक्तव्य करणाऱ्या मंत्र्याला मंत्रिमंडळात ठेऊ नका अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी केली आहे. ते जालन्यातील वडीगोद्री येथे पत्रकारांशी बोलत होते. आज जगभरात कांद्याला मागणी आहे. कांद्याचे आयातशुल्क दोन महिन्यांपूर्वी शून्यावर आणलं असतं तर कांदा उत्पादक शेतकऱ्याला चार पैसे शिल्लक मिळाले असते, अशी टीका शेट्टी यांनी कांद्याबाबत कोकाटे यांनी केलेल्या वक्तव्यावरून केली आहे.

### तब्बल २ वर्षा नंतर सोलापुरात जयंतीनिमित्त ५१ फुटी हनुमान मूर्तिचे झाले दर्शन





दैनिक आपला विदर्भ

**सोलापूर /प्रतिनिधी :** सोलापूरच्या तुळजापूर नाका मड्डी वस्ती परिसरात वडार समाज बांधवांनी १ कोटी ७५ लाख रुपये गोळा करून दोन वर्षांपूर्वी ५१ फुटी हनुमान मूर्ती उभी केली. आज तब्बल २ वर्षानंतर हनुमान जयंतीच्या निमित्ताने ती भाविकांसाठी खुली करण्यात आली आहे. सोलापुरातील ही विशालकाय भव्यदिव्य मूर्ती सध्या हनुमान भक्तांसाठी श्रद्धेचं केंद्रबिंदू ठरत आहे. आज सकाळपासून हनुमान भक्तांनी या मूर्तिचे दर्शन घेण्यासाठी मोठ्या संख्येने गर्दी केल्याचं चित्र दिसून आल. या मूर्तीसाठी १७ विभागांकडून नाहरकत प्रमाणपत्र लागणार होते. त्यामुळे मागच्या २ वर्षांपासून ही मूर्ती पांढऱ्या कापडाने झाकून ठेवण्यात आली होती.मात्र आता सर्व नाहरकत प्रमाणपत्र मिळालेले असून प्रशासकीय अडथळ्यांच्या मार्ग आतामोकळाझालाआहे.

# भाजप राजवटीकडून सर्वांची फसवणूक

## माजी खासदार विनायक राऊत यांची टिका



दैनिक आपला विदर्भ

**रत्नागिरी/प्रतिनिधी : भाजप राजवटीकडून सर्वांची फसवणूक होत आहे. एसटी कामगारांची फसवणूक, लाडक्या बहिणींची फसवणूक, इतर योजना बंद पडल्या आहेत. पीक विमा कंपन्यांचा भरघोस फायदा करून देण्याचे काम हे सरकार करत आहे. या सर्वांविरोधात जनतेचा आक्रोश खूप मोठा आहे. त्याला साथ देण्यासाठी उद्धव ठाकरे शेतकऱ्यांच्या बांधावर जाणार आहेत. अशी माहिती माजी खासदार विनायक राऊत यांनी पत्रकार परिषदेमध्ये दिली.**

यावेळी माजी खासदार विनायक राऊत म्हणाले की, नारायण राणेंच्या बुद्धीची नेहमी कीव येते, मला त्यांच्यावर टीका करायची नाही. ते उतारवयात आहेत, साठी बुद्धी नाटी असं त्यांचं झालेले आहे. कोंबडी वडे केवळ हॉटेलमध्येच मिळतात असं नाही, कोकणातल्या प्रत्येक घरात कोंबडी वडे मिळतात.कोंबडीचोरांना कोंबडी वाड्याचं महत्व कळणार नाही. कोकणी माणूस आणि उद्धव ठाकरे, मातोश्री यांचं जे नाते आहे ते कोंबडीवड्यावर नाही. उद्धव ठाकरे जे येतील ते कोंबडी चोरांना गाडण्यासाठी येतील,असे ते म्हणाले. केवळ गोगावलेच नव्हे तर, एकनाथ शिंदे यांचा देखील चंबू गबाळा आवळायला भाजपने सुरुवात केली आहे. प्रताप सरनाईक यांच्या खात्याची दयनीय अवस्था भाजपने केली आहे. ठाण्यातले प्रकल्प बंद पाडले, मुंबईत एकनाथ शिंदे यांनी सुरू केलेली कामं बंद पाडली, त्यांची गोची करून त्यांना घरचा रस्ता दाखवला जाणार आहे. कोणत्याही परिस्थितीत पालकमंत्री पदाचा तिढा आज सुटणार नाही. शिंदे-शाह आशा अनेक वेळेला बैठका होतात. पण त्या बैठकीतून काही निष्पन्न होत नाही.त्या बैठका यशस्वी झाल्या असत्या तर एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाले असते.अर्थसंकल्पात कोकण कुठे दिसतोय का? हे आम्हाला दुर्बीण घेऊन शोधावं लागतंय.काहीही नवीन कोकणात आणलेलं नाही, केवळ थापेबाजी चालली आहे. बजेटमध्ये कोकणाला काहीही मिळाले नाही, हे इथल्या शासनकर्त्यांचे अपयश आहे. नितेश राणे फक्त स्वप्न बघत राहावे, डराव डराव करून बेडूक उड्या मारण्याची फक्त सवय आहे त्यांना. ते उंचीप्रमाणेच बोलत आहेत, त्यामुळे आम्ही त्यांना फार किंमत देत नाही.या मुजोर आणि गर्विष्ठ मंत्र्याला धडा शिकविण्याचे काम मी सुरू केलेले आहे.नितेश राणे यांना अपात्र करा म्हणून गव्हर्नरकडे अपील केले आहे. ते जर झाले नाही तर पुढच्या १५ दिवसांत हायकोर्टात याचिका दाखल करणार असल्याचे ते म्हणाले.माणिकराव कोकाटे यांची मुख्यमंत्र्यांनी ताबडतोब हाकालपट्टी करायला पाहिजे होती. ज्या पद्धतीने त्यांनी शेतकऱ्यांची चेष्टा केली, अशा पद्धतीची चेष्टा यापूर्वी कोणत्याही मंत्र्यांनी केली नाही. निवडणुकीच्या वेळी ज्या पद्धतीने मते विकत घेतली त्यानंतर या सगळ्यांची मस्ती वाढलेली आहे.माणिकराव कोकाटे सारखे मंत्री महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळामध्ये असणे, हे महाराष्ट्राचे दुर्दैव आहे.रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग महाराष्ट्रातील ड्रग्ज माफियांचा अड्डा बनलेले दोन जिल्हे. ड्रग्ज माफीये सध्याच्या शासन कर्त्यांच्या आशीर्वादाने ड्रॅगचे व्यवसाय करतात. त्यांना शासनाचा आधार आहे. त्यामुळे पोलीस कारवाई करत नाही. जरी कारवाई करतात त्याच्या शत पटीने ड्रॅग्जचा व्यवसाय होत असतो. विहीर पाणी स्थगिती दिल्याने व सरकारने नियोजन न केल्यामुळे महाराष्ट्राला पाणी टंचाईची समस्या सहन करावी लागणार आहे. विहीर किंवा बोअरमालक यांच्या पाण्याचा काळाबाजार होऊ नये, म्हणून त्यांच्यावर नियंत्रण आणणे योग्य आहे. शिवसेना सचिव पदावर सुधीर साळवी यांची नियुक्ती झाली आहे याचा आम्हाला अभिमान आहे.कोणत्याही परिस्थितीत आम्ही रत्नागिरीत प्रीपेड मीटर लावू देणार नाही. प्रीपेड मीटर बसवतील तेव्हा आम्ही त्याची होळी करू,असा इशारा यावेळी माजी खासदार विनायक राऊत यांनी दिला. आम्हाला बाजारात विकत घेऊन पक्षाचे पदाधिकारी घ्यायचे नाही आहेत. सहदेव बेटकर स्वतःच्या मनाने आमच्या पक्षात आले आहेत. त्यांना कोणतंही आमिष दाखवले नाही.शिवसेना पक्ष वाढवण्यासाठी ते आलेले आहेत.तिकडे आत्ताचे जे काही पक्ष प्रवेश होत आहेत, पाच-पंधरा लाख घ्या माझ्याकडे या. पंधरा लाख सांगायचे आणि ५० हजार द्यायचे, आणि पक्षप्रवेश करून घ्यायचा नंतर तोंडाला पाने पुसायची असा उद्योग भाजपचा सुरू आहे. स्थानिक पक्ष नेतृत्व आहेत, त्यांच्या वर जबाबदारी सोपवणार आहोत. जे सोईस्कर ठरेल ते त्यांनी घ्यावे. कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांचा आग्रह आहे. मुंबई महापालिका सहित इतर महापालिकांमध्ये, जिल्हा परिषदांमध्ये स्वतंत्र निवडणुका लढवाव्यात.या संदर्भात निर्णय होण्याची शक्यता आहे. अशी माहिती ही माजी खासदार विनायक राऊत यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

# महाराष्ट्रातील एक बोकड्या खाटकाच्या लाकडावर उभा - संजय राऊत यांची टीका

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्रात एक बकरा आहे आणि तो बकरा खाटकाच्या लाकडावर उभा आहे. त्या बकऱ्याला उभा केलेला आहे आणि सांगितलेल्या आहे. फार शहाणपणा केला तर मारू टाकले जाईल. असं दिल्लीत या बकऱ्याच्या कानात कोणीतरी सांगितले. तुम्हाला युबीटी माहित आहे तर एसएनची गट माहित असायला हवा.सामनात असं जर म्हटले असेल तर त्यात चुकीचं आहे ? आम्ही इंडिया आघाडी गट म्हणून बांधील आहोत. हुकूमशाही विरोधात लढायचे असेल तर काँग्रेसने पुढाकार घेतला पाहिजे सर्व सदस्यांबरोबर वारंवार संवाद ठेवला पाहिजे जो संवाद कमी झालेला आहे. पुढील राजकीय घडामोडीत आम्ही एकत्र बसणार आहे. अशी माहिती खासदार संजय राऊत यांनी माध्यमांशी बोलताना दिली



अमित शहा गृहमंत्री आहेत त्यांच्यासोबत लष्कराचा हेलिकॉप्टर आहे ते काय रायगडावर चालत जाणार नाहीत. खाली तटकरेंकडे जेवणाचा कार्यक्रम आहे. अमित शहा, आशिष शेलार, एकनाथ शिंदे भेट होणार आहे. एकनाथ शिंदे यांचे ते नेते आहेत. भाजप पक्षाचे प्रमुख अमित शहा आहेत. पक्षप्रमुख दिल्लीतून येतात तर त्यांना तिथे जावं लागेल. राज्याचे मुख्यमंत्री गेल्या अनेक महिन्यांपासून नाशिक रायगड या प्रमुख जिल्ह्यांना पालकमंत्री देऊ शकत नाही, तुम्ही काय राज्य चालवणार आहात. महात्मा फुले आणि त्यांचे कार्य त्यांचे जीवन चरित्र याबाबत कुठलाही वाद असता कामा नये, त्यांच्या संदर्भातील चरित्रावर चित्रपट प्रसिद्ध केलेलं आहे. त्यावर बंदी घालणार आहात का ? चित्रपटा संदर्भातल्या प्रमुख लोकांशी माझी आणि शिवसेनाप्रमुखांची चर्चा झाली. मग त्या पुस्तकावर बंदी घालणार आहात का सरकारने पुस्तक तयार केलेले आहे. अनंत महादेवन हे जाणकार दिग्दर्शक आहेत, सामाजिक बांधिलकी असणारे चित्रपट त्यांनी तयार केले आहेत. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची जबाबदारी आहे. चित्रपट कट शिवाय लोकांसमोर आणायचे. सेन्सॉर बोर्डावर भाजपाचे चमचे आहेत.जगभरात फुले यांचे कार्य पोहोचणे ही देवेंद्र फडणवीस यांची जबाबदारी आहे. उदयनराजे यांचा इतिहास मला माहित नाही, तुम्ही त्यांच्याशी बोला. असे मत यावेळी खासदार संजय राऊत यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.

### यूपीआय ठप्प; गूगल पे, फोन पे आणि पेटीएम बंद

**मुंबई/प्रतिनिधी :** युनिफाईड पेमेंट इंटरफेस अर्थात यूपीआय ठप्प झाले आहे. यामुळे थेट बँक खात्यामार्फत होणारे आर्थिक व्यवहार बंद झाले आहेत. गूगल पे, फोन पे आणि पेटीएम यांच्यासह अनेक ॲपचा यूपीआय प्लॅटफॉर्म बंद पडला आहे. यामुळे मोबाईलद्वारे झटपट आर्थिक व्यवहार करण्याची सवय झालेल्यांची पंचाईत झाली आहे. दुपारी नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया अर्थात एनपीसीआय यांनी त्यांच्या अधिकृत हँडलवरुन एक्स पोस्ट करुन यूपीआय ठप्प असल्याचे जाहीर केले.

यूपीआय ठप्प झाल्यामुळे ऑनलाईन आर्थिक व्यवहार करणाऱ्यांचे हाल होत आहेत. सर्व ऑनलाईन आर्थिक व्यवहार बंद आहेत. दुपारपासून देशभरातून मोठ्या संख्येने तक्रारी येण्यास सुरुवात झाली आहे. ऑनलाईन आर्थिक व्यवहार खोळंबल्यामुळे गोंधळाची स्थिती निर्माण झाली आहे. तंत्रज्ञ परिस्थिती सुरळीत करण्यात गुंतले आहेत. याआधी काही दिवसांपूर्वी थोड्या वेळासाठी यूपीआय ठप्प झाले होते. अवघ्या काही दिवसांत दोन वेळा यूपीआय ठप्प झाल्यामुळे उलटसुलट चर्चेला उधाण आले आहे.

# नियमांचा भंग झाल्यास तीन वर्षाची शिक्षा

## भाजप नेते किरीट सोमय्या यांची पत्रकार परिषदेत माहिती

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** मशिदीवरील भोंग्यांचा आवाज बाहेर जाण्याच्या विरोधात फडणवीस सरकारचे कडक नियम आहेत.मशिदीवरील भोंग्यांच्या आवाजावर, ध्वनी प्रदूषणावर आता देवेंद्र फडणवीस सरकारने कडक निर्बंध घातले आहेत.त्या भोंग्यांचा आवाज हा त्या मशिदीपुरताच मर्यादित असणार, या नियमांचा भंग झाल्यास तीन वर्षाची शिक्षा केली आहे. अशी माहिती माध्यमांशी बोलताना भाजप नेते किरीट सोमय्या यांनी दिली.

यावेळी ते पुढे म्हणाले की, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आता मशिदींवरील भोंग्यांच्या संबंधात कडक नियमावली तयार केली आहे. महाराष्ट्र पोलीस यांनी आता अनधिकृत मशिदींवर भोंगे लावता येणार नाही. तसेच अधिकृत मशिदींवर पोलिसांची परवानगी घेतल्यानंतरच भोंगे लावता येणार, भोंग्यांचा, लाऊडस्पीकरच्या सोबत ध्वनी नियंत्रणाची, ध्वनी प्रदूषण मोजण्याचे यंत्र ही बसवावे लागणार, असे निर्देश दिले आहेत.मुंबई शहरात २००० हून अधिक मशिदींवर ८००० भोंग्यांचा उपयोग केला जात होता. यापैकी फक्त २०० माशिदींनी लाऊडस्पीकर वापरण्याची परवानगी घेतली होती. मुंबई उच्च न्यायालयाने सुद्धा २२ जानेवारी २०२५ रोजी यासंबंधी एक आदेश दिला होता. ज्यात अशा प्रकाराने ज्या मशिदींवर लाऊडस्पीकरचा वापर होतो, त्याच्या ध्वनी, आवाज यांच्यावर नियंत्रण असले पाहिजे, असे आदेश दिले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गेल्या महिन्यात विधानसभेत याबद्दल कडक निर्बंध घातले जाणार, असे घोषित केले होते. काल महाराष्ट्र पोलिसांनी या संबंधात नियमावली घोषित केली आहे.

भाजपा किरीट सोमय्या यांनी मागणी केली होती की, मुंबईत मोठ्या प्रमाणात अनधिकृत मस्जिदी आहेत. अनेक भू माफिया हे मशिदीच्या निमित्ताने सबब दाखवून लँड, जमीन अवैधरित्या, बेकायदेशीर रित्या कब्जा करण्याचा प्रयत्न करीत आहेत. सोमय्या यांनी गेल्या दोन महिन्यात असे एक डझन अशा अनधिकृत मशिदींच्या परिसराच्या




भेटी घेतल्या. स्थानिक महापालिका व पोलीस अधिकाऱ्यांनाही हे दाखवून दिले. मुंबई व महाराष्ट्राच्या जनतेने आता मशिदींवरील भोंग्यांचा आवाज जराही मोठा असला, नियमाचा भंग करणारा असला की ताबडतोब त्यांनी स्थानिक पोलीस स्टेशनला तक्रार करायची. पोलिसांनी ताबडतोब दखल घेऊन हे भोंगे अनधिकृत असल्यास त्यावर ताबडतोब कायदेशीर कारवाई करावी लागणार आहे.मशिदींच्या संबंधित अधिकाऱ्यांनी तीनदा ध्वनी प्रदूषण कायद्याचा भंग केल्यास, मशिदींवरील भोंग्यांचा आवाज शेजारच्या वस्त्यांमध्ये पोहोचत असेल तर त्यांच्या विरोधात एक लाख रुपये पर्यंतचा दंड व सतत नियम भंग झाल्यास तीन ते पाच वर्षांची शिक्षा भोगावी लागणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा मशिदींच्या भोंग्यांवरील नियंत्रण, अधिकृत व अनधिकृत मशिदींवरील भोंग्यांवर, लँड कडक निर्बंध घातले आहेत, त्याचे किरीट सोमय्या यांनी स्वागत केले.बीड येथील शिवाजीनगर पोलीस ठाण्यात अपात्र, घुसखोर लोकांनी बनावटी दस्तावेज, शपथपत्र दाखवून जन्म प्रमाणपत्र मिळविले त्याच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.एकबाल मुन्शी कुरेशी, फ ` मुन्निसा बेगम मैनोदीन शेख एकूण ५० लोकांवर भारतीय दंड संहिता १८६० अंतर्गत कलम ४२०, ४६८, ४७१ वर बनावटी दस्तावेज, खोटे शपथपत्र व सरकारी अधिकाऱ्यांची फसवणूक करून जन्म प्रमाणपत्र मिळविले म्हणून बीड जिल्ह्यातील शिवाजी नगर पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. आत्ता या घुसखोर, अपात्र, बांगलादेशी रोहिंग्या वर कारवाई करण्यात आली आहे.

गेल्या दोन महिन्यात किरीट सोमय्या यांच्या तक्रारी व पुराव्याच्या आधारावर १८ ठिकाणी गुन्हे दाखल करण्यात आले आहे. संजय राऊत स्टंट करणारी व्यक्ती आहे. भगवे वस्त्र घालणारे आता हिरवे वस्त्र घालत आहेत. ना घर का ना घाट का अशी परिस्थिती ठाकरे गटाची झाली आहे. अनधिकृत मस्जिद आणि लाऊडस्पिकर सर्व अनधिकृत मस्जिद आणि लाऊडस्पीकर सर्वे पाडले जाणार मुंबईत कुठेही ठेवले जाणार नाहीत. अशी माहिती भाजप नेते किरीट सोमय्या यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

## विविध वृत्त...

### ७०० वर्षांपूर्वीपासून भंडाऱ्यात होतोय हनुमान जन्मोत्सव, भृशुंड गणेश मंदिरातील क्षत्रिय हनुमान मूर्ती



दैनिक आपला विदर्भ

**भंडारा/प्रतिनिधी :** भंडारा शहरातील मेंढा परिसरात भृशुंड गणेश मंदिर आहे. या मंदिरात ७०० वर्षापूर्वी हनुमान मूर्तीची स्थापना करण्यात आली. विशालकाय वृक्षाच्याखाली या मूर्तीची स्थापना करण्यात आली होती. मात्र, कालांतराने तो वृक्ष कोलमडला किंवा त्याची कटाई करण्यात आली, तेव्हापासून ही हनुमानाची मूर्ती बिना छताने उभी आहे. हनुमानाची मूर्ती गदाधारी असते. मात्र, भंडाऱ्यातील या मूर्तीच्या हातात गदा नाही तर, कमरेला कट्यार आणि शेपटीवर शंकरजीची पिंड असून एका हातावर चंद्राची कोर आहे. हातात गदा नसलेली हनुमानाची मूर्ती आहे. ही क्षत्रीय जागृत हनुमान मूर्ती म्हणून ओळखल्या जाते. या मूर्तीला अनेक हनुमान भक्तांनी छत किंवा स्लॅब टाकण्याचा प्रयत्न केला. मात्र, आजपर्यंत कुणीही यात यशस्वी झाले नाहीत. हनुमान मूर्तीची उंची दरवर्षी वाढतं असते, अशी श्रद्धा इथं येणाऱ्या भक्तांची आहे.

### सर्वसामान्यांच्या खिशाला कात्री! सोन्याच्या दरात २ हजार रुपयांची वाढ

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** सध्या लग्नसराईचे दिवस सुरु असून गेल्या काही दिवसांपासून सोन्याच्या दरात घसरण पाहायला मिळाली होती. त्यामुळे सोनं खरेदीरांना सोनं खरेदीसाठी काहीसा दिलासा मिळाला होता. मात्र आता पुन्हा एकदा सोन्याच्या दराने तेजी घेतली आहे. घसरणीनंतर सोन्याच्या दरात २ हजार रुपयांची वाढ झाली आहे. त्यामुळे सर्वसामान्यांच्या खिशाला कात्री बसत आहे.

आज जाहीर झालेल्या सोन्याच्या दरानुसार २४ कॅरेट सोन्याच्या दरात २ हजार २० रूपये प्रति १० ग्रॅम इतकी वाढ झाली आहे. त्यामुळे २४ कॅरेट १० ग्रॅम सोन्याची किंमत ९५ हजार ५५० रुपये इतकी आहे. तर ८ ग्रॅम सोनं ७६ हजार ४४० रुपये इतका आहे. तसेच १ ग्रॅम सोनं ९ हजार ५५५ रुपयांनी विकले जात आहे.

इतर शहरांमध्ये आज सोन्याचा भाव

मुंबई, पुणे, जळगाव, नागपूर, अमरावती, सोलापूर, छत्रपती संभाजी नगर, वसई-विरार, नाशिक, भिवंडी या शहरांत २२ कॅरेट सोन्याचे दर ८ हजार ४५ रुपये आणि २४ कॅरेट सोन्याचे दर ९ हजार ५४० रुपयांपर्यंत पोहोचले आहे.

चांदीचे दर काय?

चांदीच्या दरातही आज १०० रुपयांची वाढ झाली आहे. त्यानुसार एक किलो चांदीची किंमत आज ९७ हजार १०० रुपये इतकी झाली आहे.

### स्पायडर मॅनसारखा इमारतीवर चढून चोरी; पोलिसांनी १२ तासांत मुसक्या आवळल्या, ३६ लाखांचे दागिने जप्त

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** चोरी करुन पैसे कमावणे किंवा आरामदायी जीवन जगण्यासाठी चोरटे कोणत्या थराला जातील हे सांगता येत नाही. काही दिवसांपूर्वी कल्याणमधील एका चोरट्याचा तेलंगणात एन्काऊंटर केल्याची घटना घडली. विशेष म्हणजे हा चोरटा चक्क विमानाने फिरस्ती करुन मोठमोठ्या शहरात चोरीचा प्लॅन आखायचा. त्याच्यावर विविध शहरांत गुन्हेही दाखल होते. आता, मुंबईतील असाच एक स्पाईडरमॅनसारखा चोरटा पोलिसांच्या तावडीत सापडला आहे. मालाडमधील एका ठिकाणी चोरी केल्यानंतर पोलिसांनी त्याला १२ तासांत बेड्या ठोकल्या आहेत. तसेच, चोरट्याकडून ३६ लाख ४० हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने आणि हिरे देखील जप्त करण्यात आले आहेत.

मुंबईतील मालाड पश्चिम, रामबाग लेन व्हान्स पलाझो बिल्डिंगमध्ये मध्यरात्री स्पायडरमॅनप्रमाणे इमारतीवर चढून चोरी करणाऱ्या चोरट्याला मालाड पोलिसांनी अवघ्या १२ तासांच्या आत अटक केली. मालाड पोलिसांनी चोराकडून ३६ लाख ४० हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने आणि हिरे जप्त केले आहेत. मालाड पोलिसांनी सापळा रचून जोगेश्वरी रेल्वे स्थानकाच्या रुळांवर फिल्मी शैलीत १ किलोमीटर धावून आरोपीला अटक केली. संतोष सुरेश चौधरी उर्फ वैतू (२३) असे अटक आरोपीचे नाव आहे. आरोपी हा सराईत गुन्हेगार असून त्याच्यावर मुंबईच्या विविध पोलीस ठाण्यात ३० पेक्षा अधिक गुन्ह्यांची नोंद आहे.

दरम्यान, सध्या हा चोरटा आरोपी पोलिसांच्या ताब्यात असून आरोपीने अजून कुठे चोरी किंवा इतर कोणता गुन्हा केला आहे का, याचा तपास घेत आहेत.

# हिवरा साबळे वासीयांना हक्काचे पाणी कधी मिळणार ?

## दरवर्षी टँकरच्या पाण्यावर भागवावी लागते उन्हाळ्यात तहान



संग्रहीत छायाचित्र

भाग ३०


दैनिक आपला विदर्भ

**मेहकर : तालुक्यातील हिवरा साबळे हे गाव वर्षानुवर्षांपासून पाणी टंचाईग्रस्त गाव आहे. या गावातील पाणीटंचाई कायमस्वरूपी मिटावी, यासाठी सन २०२३ मध्ये तब्बल २ कोटी ६२ लाख ३६ हजार रुपये किमतीच्या जल जीवन मिशन योजनेच्या कामाला मंजुरात देण्यात आली. मात्र, भ्रष्टवृत्तीच्या अधिकारी यांच्यामुळे सदर पाणीपुरवठा योजना रखडली आहे. केवळ १३.२२ टक्के काम होऊनही जल जीवन विषयांची योजना बंद पडल्याने हिवरा साबळे वासीयांच्या घशाची कोरड कायम आहे.आता उन्हाची तीव्रता वाढली असून पाण्याचे स्त्रोत आटले आहेत.त्यामुळे हिवरा साबळे वासीयांना टँकरच्या पाण्यावर तहान भागवावी लागत आहे. मात्र, सदर जलजीवन मिशन योजनेचे काम पूर्ण झाले असते तर आज हिवरा वासीयांची पाण्यासाठी होणारी फरपट थांबली असती, अशी चर्चा ग्रामस्थ करू लागले आहे.**



देविदास खनपटे
मुख्य संपादक

तालुक्यातील हिवरा साबळे या गावात अनेक वर्षापासून पाण्याची समस्या कायम आहे. दरवर्षी उन्हाळ्यात पाण्यासाठी होणारी भटकंती पाचवीलाच पुजलेली असताना यावर कायमस्वरूपी तोडगा काढावा, अशी मागणी अनेक वर्षांपासून असताना सन २०२३ मध्ये जलजीवन मिशन योजनेअंतर्गत पाणीपुरवठा करण्यासाठी तब्बल २ कोटी ६२ लाख ३६ हजार रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला. सदर कामाला ३१ जानेवारी २०२३ रोजी प्रशासकीय मान्यता मिळाली. या योजनेअंतर्गत विहीर खोदकाम, पंपगृह, पंपिंग मशीन, मुख्य जलवाहिनी, पाण्याची वितरण व्यवस्था,आदी कामे बारा महिन्याच्या कालावधीत करणे अपेक्षित असताना तब्बल २ कोटी ६२ लाख रुपयांच्या निधीतून केवळ १३.२२ टक्के काम जल जीवन मिशन योजनेअंतर्गत करण्यात आले.नंतर सदर काम रखडले आहे. तर आज रोजी जल जीवन मिशन योजनेचे काम केवळ १३ टक्यावर बंद पडले असताना आता उन्हाळ्याच्या दिवसात गावामध्ये भीषण पाणी टंचाई निर्माण झाली आहे. त्यामुळे टँकरने पाणीपुरवठा करावा लागत आहे. गावातील पाण्याची सुविधा करण्यासाठी सुरुवातीला शासनाने कोट्यावधी रुपयाचा खर्च...मात्र, त्याचा कोणताही फायदा न झाल्याने पुन्हा टँकरवर खर्च करून गावातील नागरिकांची तहान भागविण्याची वेळ प्रशासनावर आली आहे. सदर काम पूर्ण झाले असते तर आज रोजी गावात पाणीटंचाई निर्माण झाली नसती, गावातील नागरिकांना



त्यांच्या हक्काचे पाणी मिळाले असते, गावातील पाण्यासाठी होणारी पायपीट थांबली असती. मात्र, अधिकारी व पदाधिकाऱ्यांच्या त्याचबरोबर कंत्राटदाराच्या दुर्लक्षित धोरणामुळे योजना अर्धवट पडली आहे. त्यामुळे गावात आज रोजी भीषण पाणीटंचाई निर्माण झाली आहे. हिवरा साबळे वासीयांना टँकरच्या पाण्यावर आपली तहान भागवावी लागत आहे. जेव्हा टँकर येईल तेव्हा पाणी घ्यायचे नसता, टँकरची वाट पाहत बसायचे अशी स्थिती हिवरा साबळे वासीयांची झाली आहे.

### हिवरा साबळेवासीयांना हक्काचे पाणी कधी मिळणार ?

हिवरा साबळे हे गाव कायम पाणीटंचाईग्रस्त गाव आहे. उन्हाळा लागतात गावामध्ये टँकरने पाणीपुरवठा करावा लागतो तहान भागवण्यासाठी पर्यायी व्यवस्था करावी लागते.गावातील पाणीटंचाई निकाली काढण्यासाठी जलजीवन मिशन योजनेचे काम सुरू करण्यात आले असले तरी, सदर कामे केवळ १३ टक्क्यावर रखडले असल्याने आज रोजी गावात भीषण पाणीटंचाई आहे. नागरिकांना टँकरच्या पाण्यावर तहान भागवावी लागत आहे.सदर जलजीवन मिशन योजनेचे काम पूर्ण झाले असते तर आज रोजी गावात पाणीटंचाई निर्माण झाली नसती. नागरिकांची पायपीट थांबली असती, हिवरा वासीयांना हक्काचे पाणी मिळाले असते. मात्र भ्रष्ट वृत्तीने हे काम अद्यापही पूर्ण झाले नसल्याने हिवरावासीयांना हक्काचे पाणी कधी मिळणार असा प्रश्न निर्माण झाला आहे.

# खातगाव परीसरात अवैध रेती ची वाहतूक करणारा ट्रॅक्टर जप्त

दैनिक आपला विदर्भ

■ मनोज गोरे

**चंद्रपूर :** सिंदेवाही तालुक्यामध्ये अवैध रेती चोरी होऊ नये याकरिता महसूल विभागाने पोलीस विभागाच्या सहकार्याने भरारी पथक स्थापन केले आहे. याच भरारी पथकाने सिंदेवाही तालुक्यातील खातगाव येथे शुक्रवारी रात्री १.३० वाजता रेतीची वाहतूक करणारा ट्रॅक्टर जप्त केला. भरारी पथकास गस्ती दरम्यान खातगाव येथील उमा नदी घाटामध्ये लाल रंगाचा महिंद्रा कंपनीचा विना क्रमांकाच्या ट्रॅक्टर आणि क्रमांक नसलेली रेती भरलेली ट्राली आढळून आली. सदर वाहन थांबवून वाहनाचे निरीक्षण केले असता त्यामध्ये १ ब्रास रेती आढळून आली. पथकाने ट्रॅक्टर चालकाकडे रेती परवान्याबद्दल विचारणा केली असता कोणताही वैध परवाना नसल्याचे चालकाने सांगितले. त्यामुळे अवैध रेती वाहतूक करत असल्याने ट्रॅक्टर सिंदेवाही तहसील कार्यालयात जमा करण्यात आला असुन सदर ट्रॅक्टर वर दंडात्मक कारवाई करण्यासाठी सिंदेवाही तहसीलदार यांनी प्रस्ताव उपविभागीय अधिकारी चिमूर यांच्याकडे पाठवला आहे.

सदर कारवाई तहसीलदार संदीप पानमंद यांच्या मार्गदर्शनाखाली नायब तहसीलदार मंगेश तुमराम, महसूल सेवक तुलसीदास




गेडाम, शिपाई चक्रधर गेडाम आणि पोलीस कर्मचारी नारायण येग्गेवार यांनी केली आहे.

### 'येथे पुन्हा येणार नाही!' सिंहगड पाहण्यासाठी आलेल्या कॅनडीयन पर्यटकासोबत धक्कादायक प्रकार

**मुंबई/प्रतिनिधी :** छत्रपती शिवाजी महाराज यांचे शौर्य आणि पराक्रम सातासमुद्र पार पोहचले आहे. त्यामुळे महाराजांच्या मावळ्यांनी लढवलेले किल्ले पाहण्यासाठी परदेशातून नागरिक येत आसतात. परंतु मराठी भाषिक किंवा भारतातली इतर भाषा येत नसलेल्या पर्यटकांना आपल्या महाराष्ट्रतील काही तरुण शिविगाळ कारायला लावत असल्याचा एक व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हयरल होतोय. महाराष्ट्राच्या अस्मितेवरर कलंक लावण्याचा काम काही टवाळ तरुण करताना दिसतायत.

कॅनडा देशातून आलेला पर्यटक सिंहगड किल्ला सर करत होता. त्यावेळी त्याला काही महाराष्ट्रतील तरुण भेटले. याप्रसंगी आपण कुठून आलो आहेत, कसे आलो आहोत? हा मूळ परिचय सोडून त्या तरुणांनी विदेशी पर्यटकाला अील भाषेत शिविगाळ करणयास सांगितलं. त्यांच्या सांगण्यावरून पर्यटकाने शिविगाळ केली. मात्र शिवीगाळ करत असताना आपण काहीतरी चुकीचं बोलत असल्याचं पर्यटकाला वाटलं. कारण विदेशी पर्यटक बोलत असताना तरुणांमध्ये हास्याचा लोट पसरला होता.

# तालुक्यात पाणीटंचाईचे सावट; विहिर अधिग्रहण टँकरच्या पाण्यावर नागरिकांना तहान भागवण्याची वेळ

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** मेहकर : तालुक्यात वर्षानुवर्षापासून अनेक गावात पाणीटंचाईचा प्रश्न कायम आहे.या पाणीटंचाईवर कायमस्वरूपी मात करण्यासाठी कोट्यावधी रुपयाचा निधी जाहीर झाला असला तरी अधिकारी व पदाधिकारी यांच्या उदासीन धोरणामुळे गावातील पाणीटंचाई कायम आहे.सन २०२५ मध्ये जानेवारी ते जून या कालावधीत १०७ गावात भीषण पाणी टंचाई निर्माण झाली असल्याची माहिती कृती आराखड्यातून मिळाली आहे.

सन २०२४-२५ चा पाणी टंचाई चा ११७ गावाचा कृती आराखडा मंजुरीसाठी सादर करण्यात आलेला आहे . त्यामध्ये ऑक्टोबर ते डिसेंबर या कालावधीत दहा गावात पाणीटंचाई निर्माण झाल्याचे शासकीय आकडेवारी दिसून येत आहे. तर जानेवारी २०२५ ते जून



२०२५ या कालावधीमध्ये तब्बल १०७ गावांमध्ये भीषण पाणी टंचाई निर्माण झाली आहे. याबाबत कृती आराखडा सादर करण्यात आला आहे. यामध्ये १०२ गावात १०७ पाण्याचे स्त्रोत अधिग्रहण करण्यात आले आहेत. त्यामध्ये १०२ विहिरी अधिग्रहण करण्यात आलेल्या आहेत.त्याचबरोबर एकूणच गावात १७ गावात १९ पाण्याचे स्त्रोत उपलब्ध करण्यासाठी टँकरने पाणीपुरवठा करण्याचा आराखडा सादर करण्यात आला आहे. त्याचबरोबर नऊ ठिकाणी नळ योजना दुरुस्तीचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.२२ गावात २९ हातपंप सुरू करण्याचा निर्णय कृती आराखड्यातून सादर करण्यात आला आहे. त्याचबरोबर दोन ठिकाणी तात्पुरती नळ योजना असा कृती आराखडा सादर करण्यात आला असून ऑक्टोबर ते डिसेंबर २०२४ या कालावधीत १० तर, जानेवारी ते जून २०२५ या कालावधीत १०७ गावांमध्ये पाणीपुरवठा करण्याबाबत सादर केलेल्या आराखड्यात उपाययोजना सुचविण्यात आल्या असल्याची माहिती वार्षिक अहवाल आमसभेमध्ये देण्यात आली आहे. सरद या गावांमध्ये वर्षानुवर्षापासून पाणीटंचाई असताना व जलजीवन मिशन यासह इतर योजनेमार्फत दरवर्षी कोट्यावधी रुपयाचा निधी खर्च केला जात असतानाही पाणी समस्या कायम असल्याने नागरिकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. कायमस्वरूपी मिटावी, यासाठी शासन प्रशासन उदासीन असल्याने तालुक्यातील शंभरावर गावात पाणीटंचाई पाचवीलाच पुंजलेली आहे.गत दोन वर्षांपासून प्रत्येक गावात कोट्यावधी रुपयाच्या नळ योजनासाठी पाणीपुरवठा करण्यासाठी जलजीवन मिशन योजनेअंतर्गत काम केले जात आहे.मात्र, अधिकारी व पदाधिकारी यांच्या उदासीन धोरणामुळे हे काम कोणतेही पूर्णत्वास गेले नाही. त्यामुळे गावातील पाणीटंचाई कायम आहे अधिकारी व पदाधिकाऱ्यांच्या भ्रष्टवृत्तीमुळे गावातील पाणीटंचाई कायम असल्याने नागरिकांमध्ये तीव्र रोष व्यक्त केला जात आहे.

### प्रशासनावर कायम प्रश्नचिन्ह

दरवर्षी गावात पाणीटंचाई निर्माण होत असताना सदर पाणी टंचाई कायमस्वरूपी निकाली निघावी यासाठी प्रशासन ठोस निर्णय का ? घेत नाही. कोट्यावधी रुपयाचा निधी खर्च केल्यानंतरही पाणीटंचाई कायम कशी?, यावर वरिष्ठांचे नियंत्रण नाही का?, लोकप्रतिनिधी गप्प का?, असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. अधिकारी पदाधिकाऱ्यांच्या भ्रष्ट नीतीमुळे मात्र, सर्वसामान्य जनतेला दरवर्षी पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. परिणामी मायमाऊल्यांमध्ये प्रचंड रोष व्यक्त केला जात आहे.